# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई - 400008.

दूरध्वनी क्र. 23023900 फॅक्स नं.022-230 86 352


==========================================================
==

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहनमहामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे मुख्य कामगार अधिकारी वर्ग - 1 या पदावर निव्वळ करार पद्धतीने, शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमांक संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17 डिसेंबर,2016 नुसार निश्चित केलेले मासिक परिश्रमिक (मोबदल्यावर) शासकीय / निमशासकीय महामंडळे, संविधिक संस्था यामधून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांमधुन मुख्य कामगार अधिकारी वर्ग-1 या पदासाठी '' विवक्षित कामांसाठी '' करार पद्धतीने नेमणूक करण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

शैक्षणिक अर्हता व अनुभव :

अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कला, वाणिज्य किंवा विज्ञान पदवीसह मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची समाजकार्य व्यवस्थापन ( एम.एस.डब्ल्यु./ एम.एल.डब्ल्यु.), कामगार विज्ञान (एम.एल.एस.) या मधील पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक आहे.

ब) (1) एखादया औद्योगिक संस्थेतील / शासकीय , निमशासकीय सेवेतील कामगार अधिकारी किंवा कल्याण अधिकारी म्हणून किमान 10 वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

(2) समेट व अभिनिर्णय ( ॲडज्युडिकेशन) कार्यपद्धतीसहीत कारखाने व कामगार संबधि कायदयाचे परिपूर्ण ज्ञान असावे.

(3) औद्योगिक संबधामध्ये तरबेज असावा व कामगारांचे प्रश्न, त्यांची गा-हाणी हाताळण्याचे तसेच कामगार कल्याण विषयक कार्यक्रम संघटीत करण्याचे चातुर्य व कल्पकता असावी.

(4) कारखाने अधिनियम, 1948 या खाली महाराष्ट्र शासनाने विहीत केलेल्या कल्याण अधिकारी (सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती ) नियम, 1952 मध्ये घालून दिलेली अर्हता धारण केलेली अर्हता असणे आवश्यक. मराठीचे व आधुनिक संगणकीकरण हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक.

वयोमर्यादा :- कमाल 65 वर्षे

मानधन :- शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमांक संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17 डिसेंबर,2016 नुसार निश्चित केलेले मासिक परिश्रमिक, जास्तीत जास्त रु.58,500/- इतक्या मर्यादे पर्यंत राहील.

अर्ज स्विकारण्याची शेवटची तारिख:- 24.04.2017

पत्र व्यवहारासाठी पत्ता:- महाव्यवस्थापक (क.व औ.सं)
म.रा.मा.प.महामंडळ, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - 400 008.